साहित्य प्रतिष्ठान

# चुकत कोण नाही?

लेखिका : कुमुदिनी बल्लाळ

®

*ई पुस्तकाचे नांव : चुकत कोण नाही*

*लेखिका : कुमुदिनी बल्लाळ*

*मुखपृष्ठ : अमृता ढगे*

*प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान*

*© कुमुदिनी बल्लाळ २०१२*

हे ई पुस्तक विनामूल्य वितरणासाठी असून हे पुस्तक अथवा यातील अंश यांचा वापर लेखिकेच्या परवानगीशिवाय करण्यास मनाई आहे.

**संपर्क : esahity@gmail.com**

**9869674820**

आभार

या पुस्तकातील कथा या कुमुदिनी बल्लाळ लिखित आणि शारदा प्रकाशनतर्फ़े प्रकाशि त "चुकत कोण नाही" या पुस्तकात समाविष्ट आहेत . या पुस्तकातील कथा ई पुस्तकासाठी वापरण्याची परवानगी दिल्याबद्दल आम्ही शारदा प्रकाशनचे आभारी आहोत . मूळ पुस्तक महाराष्ट्रातील प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे ४५ रुपये किंमतीला उपलब्ध आहे.

## लेखिकेबद्दल थोडेसे :




**कुमुदिनी बल्लाळ**
**ठाणे**
**फ़ोन: ९८७००३६०५६**
**kumudballal@gmail.com**


हिंगणे येथील महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या संस्कारांत घडलेल्या कुमुदिनी बल्लाळ या हिंगणे, दादर, विलेपार्ले आणि ठाण्याच्या शाळांतून तीस वर्षे विद्यार्थ्यांना घडवत राहिल्या. शाळेच्या नोकरीतून जरी त्या सेच्छानिवृत्त झाल्या असल्या तरी समाजशिक्षणाच्या कार्यातून त्या सदोदित कार्यरत आहेत. ठाणे वैभव दैनिकातून लिखाण, "नवल रंगभूमी" या संस्थेतर्फ़े बालनाट्यांची निर्मिती, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या ठाणे शाखा अध्यक्षा, बालवैभव सदराच्या संपादिका, सुसंवाद आणि सावली या ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासद आणि रोटरी क्लबच्या माध्यमातून समाजातील विद्यार्थी आणि इतर घटकांसाठी त्यांचे कार्य अविरत सुरू असते.

बालसाहित्याच्या निर्मितीतील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. आकाशवाणी, वृत्तपत्रे या माध्यमांतून त्या नियमितपणे मुलांच्या संपर्कात असतातच. त्यांनी लिहिलेल्या "चुकत कोण नाही", "भावस्पर्शी बालकथा" आदि पुस्तकांचे प्रकाशन शारदा प्रकाशनातर्फ़े झाले आहे.

## अभिप्राय :

(यातील) प्रत्येक कथा काहीतरी सांगू इच्छिते. त्यातल्या व्यक्तिरेखा ह्या आजच्या वर्तमानाशी मिळत्या जुळत्या आहेत. त्यामुळे कथांमधील “सांगणं” बालवाचकांप्रमाणे पालक व शिक्षक यांनाही भिडणारे ठरते. ...व्यवहारी धावपळीत मुलांकडे नीट लक्ष द्यायला न मिळणारे पालक आणि अशा वातावरणात ज्येष्ठांनी नातवंडांबद्दल घेण्याची काळजी या गोष्टीही जाताजाता अधोरेखित होतात. लादलेल्या अभ्यासाच्या ओझ्याने वाकलेल्या असंख्य मुलांना मायेने समजावणे हा एकच पर्याय कसा उरला आहे, हे सांगणारी छोट्यांसाठी लिहिलेली पण मोठ्यांसाठी अधिक उपयोगी असणारी ही कथा पालक व शिक्षकांनी आवर्जून वाचावी अशी आहे.

---कवी प्रा. प्रवीण दवणे



# अनुक्रमणिका


सही संपली? अशी कशी ? ६

आधुनिक युगातील आरुणी १२

अशी असते मैत्री २०

गृहपाठातील आनंद २७

# सही संपली ? अशी कशी ?



रामनाथ नावाचा एक मुलगा खेड्यातून आला होता तो अभ्यासात हुशार आणि वागण्यात नीटनेटका होता. रामनाथ होता एका भटक्या जमातीत जन्मलेला. बिऱ्हाड सतत पाठीवर असल्याने रामनाथच्या शिक्षणाचा प्रश्न अवघड होता. त्याच्या वडिलांचे नाव होते धनसिंग. आपल्या मुलाला खूप शिकवावे. त्याला स्थिर आयुष्य-जीवन द्यावे असे त्यांना वाटत होते.

जेमतेम चौथीपर्यंत इथंतिथं शिक्षण करून धनसिंगाने रामनाथला वसतिगृहातमध्ये ठेवायचे ठरवले.



आता रामनाथचे वातावरण, मित्रमंडळी बदलली होती. शिवाय आईवडिलांपासून तो दूर आला

होता. सर्वच मुले नवीन. कोणी शहरातून आलेली तर कोणी खेड्यातून! सुरुवातीला सगळीच मुले गांगरतात तसा रामनाथही गांगरला पण नंतर तो चांगला सावरला, रुळला, एवढेच नव्हे तर आपल्या गुणांनी सर्व शिक्षकांचा लाडकाही बनला.

रामनाथ पाहिल्यापासूनच नीटनेटका हुशार होता. आईवडील अशिक्षित असल्यामुळे अभ्यासाच्या बाबतीत तर तो स्वावलंबी होताच. पण आता तो इतरही बाबतीत स्वावलंबी झाला होता. तो स्वतःचे कपडे, ताटवाटी, पेला धुऊन ठेवत असे. आपल्या वस्तू जागच्या जागी ठेवणे, नीट सांभाळणे त्याला जमत असे. एवढा हुशार असूनही तो गर्विष्ठ नव्हता. सर्वांशी तो मैत्रीचे संबंध ठेवत असे.



या सर्व गुणांमुळे तो सर्वांना हवाहवासा वाटत असे. तो आठव्या इयत्तेत गेला आणि त्याच्यात खूप झपाट्याने बदल होऊ लागला. हा बदल शिक्षकांच्या लक्षात आला आणि

यावर्षी तो कदाचित नापास होईल की काय, असे त्यांना वाटले.

त्याचे अभ्यासाकडे लक्ष लागेना. तो गृहपाठात अनियमित झाला. तेव्हा त्याच्या शिक्षकांनी जरा जास्त चौकशी करायला सुरुवात केली. त्यांनी वसतिगृहातील मुलांना विचारले तर ती म्हणाली, ”हल्ली रामनाथ आमच्या बरोबर नसतो. ”



रामनाथ कोणाबरोबर असतो हे मात्र त्या मुलांनी सांगितले नाही. एकदा गुरुजी अर्ध्या दिवसाची रजा घेऊन घरी जाणार होते. आपली शाळेची पुस्तके, डस्टर, खडू वगैरे जागच्या जागी ठेवून ते निघाले तेंव्हा त्यांना गेटच्या बाहेर रामनाथ दिसला. त्याच्या





बरोबरच्या मुलांना पाहून गुरुजींच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. पण त्यांच्याकडे न बघता ते घरी निघून गेले.

ज्या मुलांना त्यांनी रामनाथबरोबर बघितलं होतं. ती लाडावलेल्या, हट्टी, उघळ्या प्रवृत्तीची होती. रामनाथच्या अभ्यासातले व्यत्यय म्हणजे चित्रपट, हातगाडीवरचे खाणे-पिणे आणि क्षणिक मनोरंजन करणाऱ्या गप्पागोष्टी!



गुरुजींनी रामनाथच्या वडिलांना बोलावून घेतले व त्यांच्या कानावर ही हकिकत घातली. धनसिंगानी रामनाथचे पत्र गुरुजींना दाखवले. पत्रातील एक वाक्यं वाचून गुरुजींना हसावे की रडावे कळत नव्हते.


रामनाथने लिहिले होते माझी कंपास संपली आहे नवीन आणण्यासाठी १०० रुपये जास्त पाठवा धनसिंगाने गुरुजींकडे

१०० रुपये दिले आणि रामनाथला कंपास आणून द्यायला सांगितले.



दुसरे दिवशी शाळेत गेल्यावर गुरुजींनी रामनाथला वही तपासायला मागितली. ती अपुरी होती. गुरुजींनी दोन तीन वेळा वही मागितल्यामुळे रामनाथला ती देणे भागच होते. कशीबशी वही पूर्ण करून रामनाथने गुरुजींना वही दिली. गुरुजी म्हणाले, ‘आता काय उपयोग वही देऊन, माझी तर सही संपली’.

रामनाथला याची पूर्वपीठिका माहिती नव्हती म्हणून तो हलकेच म्हणाला, सही कशी काय संपते ?



गुरुजींनी ते न ऐकल्यासारखे केले आणि म्हणाले, ‘अरे हो, रामनाथ, तुझी कंपास संपली आहे ना ? हे घे पैसे आणि नवीन आण’.

रामनाथला आता एकदम सगळा उलगडा झाला. तो म्हणाला, गुरुजी मला क्षमा करा. मी वडिलांना नव्हे,

माझे मलाच फसवले आहे.

गुरुजी म्हणाले, ‘रामनाथ परमेश्वराने सर्वांना चांगली बुद्धी दिली आहे पण आपण तिचा उपयोग अशा प्रकारे केला तर आपल्याच पायावर कुऱ्हाड कोसळते नुकसान आपलेच होते आणि ते फार उशिरा कळते’.

असो ‘चुकत कोण नाही’ पण झालेली चूक समजून घेणे आणि तसे पुनः पुनः घडू न देणे त्यातच आपला विकास आहे, जीवनाचे यश आहे. तुझ्यासारख्या शहाण्या मुलाला आणखी काय सांगायचे. आण तुझी वही, माझी सही तुझ्यासाठी संपलेली नाही



# आधुनिक युगातील अरुणी




नवीन वर्षाचं कौतुकपूर्ण स्वागत झालं. मोठी माणसं तशी लहान मुलंही या स्वागतात अगदी मनापासून रंगून गेली होती. नव्या वर्षाची नवीन चॅनेल्स टी.व्ही. वर सुरू झाली आणि मुलांना अभ्यासाला वेळ कमी पडू लागला. मुलं अभ्यासाला 'नाही' म्हणत नाहीत पण 'आता नको, मग करतो ना' असे 'मग'चे हवाले ते देत असतात. हे हवालेच आपला घात कसा करतात ते बिचाऱ्यांना कळतच नाही.

समर्थांचा बाळू तसा वयाने फार मोठा नाही, अवघा ४ थी शिकत असलेला, मुलगा तो! पण त्याची ४ थीची परीक्षा म्हणजे जणू काही आयएएसचीच परीक्षा आहे असे बाळू सोडून सर्वांनाच वाटत होतं.



ई साहित्य प्रतिष्ठान




'अरे बाळू, तुझी परीक्षा जवळ आलीय. पण तुझे खेळाचे आणि टी.व्ही.वरचे कार्यक्रम पहाण्याचे प्रमाण जराही कमी झाले नाही. उलट या नव्या वर्षापासून ते वाढतच आहे. कसं होणार आहे तुझे परीक्षेत काही कळत नाही' - इति आई.

'आई, अगं तू कशाला काळजी करतेस, सगळीच मुलं टी.व्ही. पहातात आणि खेळतात. म्हणजे तुलनेत मी जिथे आहे अभ्यासात तिथेच राहीन, नाही का!' - बाळू.

बाळूच्या या युक्तीवादाला काय उत्तर द्यावे ते न कळून आई गप्पच बसली. 'तू जाणे आणि तुझं नशीब!' असं म्हणून तिनं स्वतःला तात्पुरतं गप्प केलं.





ई साहित्य प्रतिष्ठान



त्यानंतर रात्रीच्या जेवणापर्यंत कोणीच पुन्हा अभ्यासाचा विषय काढला नाही. जेवणाच्या टेबलावर सर्वजण जेवत असताना संयमाच्या गोष्टी निघाल्या. 'संयम ही मनाची फार मोठी शक्ती आहे', आत्या म्हणाली आणि तिनं अरुणीची गोष्ट सांगितली.

पूर्वीच्या काळात मुलं गुरुगृही अध्ययन करीत असत. तिथे त्यांना पडेल ती कामे करावी लागत. स्वावलंबन हा तिथला नित्याचा पहिला पाठ असे. शेतावरही काम करून भाजीपाला त्यांना पिकवावा लागे.



एके दिवशी गुरुजी मुलांना म्हणाले शेतात पाणी सोडलं आहे. वाफ्यात पाणी भरून झालं असेल तर बांधावर माती सरकवून पाणी बंद करा. त्यांनी दोन तीन विद्यार्थ्यांना सांगितले. अरुणीसह ती मुलं शेतावर गेली. बांध घालण्याचा त्यांनी खूप प्रयत्न केला, पण त्यांना पाणी अडवताच आले नाही.

अरुणी सोडून सर्व मुले माघारी आली. अरुणी एकटाच राहिला. संध्याकाळ झाली, अंधार पडू लागला. भुकेची भावना जागृत झाली, पण अरुणी बांधाच्या ठिकाणी

घट्ट होऊन आडवा पडला. त्यामुळे पाणी बरेचसे अडवले गेले. त्याच्या मनात दोन विचार आले, आपणही परत गेलो आश्रमात तर काय बिघडलं, बाकीचे गेलेच आहेत की! पण लगेच दुसरे मन म्हणाले, ‘इथेच तुझी परीक्षा. आहे, मनात आलेला विचार झटकून टाक आणि समोरचे काम यशस्वी कर’ हा सल्ला अरुणीने मानला.




सकाळी गुरुजी शेतात आले तेव्हा रात्रभर उपाशी तापाशी असलेला अरुणी ओल्या कपड्यात कुडकडताना दिसला. गुरुजींच्या परीक्षेत तो पास झाला. त्याला त्यांनी उत्तम आशीर्वाद दिला. मनाचे बळ ज्याच्याजवळ असतं त्याच्याजवळ अपयश यायला घाबरतं.



ई साहित्य प्रतिष्ठान

बाळू एकटक आत्याकडे बघत होता. आपणच अरुणी आहोत असं त्याला वाटत होतं. त्याने मान हालवली. काही तरी निश्चय केला आणि तो झोपायला गेला.

दुसरा दिवस रविवारचा होता. सकाळपासूनच मुलांचे कार्यक्रम टी.व्ही. वर होते. पण बाळू उठला, तोंड धुतले, दूध पिऊन, आंघोळ वगैरे आटोपून आपल्या अभ्यासाच्या खोलीत गेला. कोणी काही बोललं नाही. शांतपणे बाळूच्या हालचाली ते पहात होते. बाळू खोलीत गेल्यावर त्याच्या बाबांनी ताईला (आत्याला) शाबासकी दिली. कानीकपाळी ओरडून जे आम्हाला जमलं नाही ते या एका गोष्टीनी साधलं.





ई साहित्य प्रतिष्ठान

त्यानंतर बाळू जो अभ्यासाला लागला की परीक्षा होईपर्यंत टी.व्ही.न




पहाण्याचा त्याचा निश्चय तडीस गेला. सायंकाळी खेळायला मात्र तो जात होता.

होता होता परीक्षा झाल्या. सुट्टया लागल्या. बाळू पुनः कार्यक्रम पाहू लागला आणि एके दिवशी त्याचा परीक्षेचा निकाल घरी आला. अतिशय आतुरतेनं त्यानं आपला नंबर बघितला त्याचा पहिला नंबर आला होता. टी.व्ही.पहाणाऱ्या आणि सतत



ई साहित्य प्रतिष्ठान


खेळणाऱ्या आपल्या त्या मित्रांवर त्यांनी कुरघोडी केली होती.

त्याने आत्याला रिझल्ट कळवला

आणि शेवटी सही केली तुझा लाडका अरुणी!




# अशी असते मैत्री!




श्रीरामपूर गावातील सरस्वती विद्यालयात दोन विद्यार्थ्यांची जोडी खूप प्रसिध्द होती. मजेदार गोष्ट अशी की दोघांचेही नाव राम होते. त्यांच्या बऱ्या गोष्टी-

उंची, जाडी, आवडनिवड एवढंच नाही तर स्वभावही सारखेच मनमिळावू होते. ते सर्वांना हवेहवेसे वाटत पण त्यापेक्षा ते दोघे एकमेकांना जास्त हवेहवेसे वाटत.

त्यांच्यात फरक होता रंगाचा आणि बुध्दीचा! एक होता सावळा तर एक होता



गोरा! सावळा होता बुध्दिमान, गोरा मात्र सामान्य बुध्दीचा! रामाचे मित्र त्यांना काळा राम, गोरा रामची जोडी म्हणत आणि काळ्या रामाला कृष्णा म्हणत. ते नाव अनेकांच्या तोंडून अनेक वेळा ऐकल्यामुळे काळ्या रामाला ते आपले खरेच नाव वाटू लागले.


आता हळूहळू त्याचे तेच नाव रूढ झाले.

अगदी पहिली-दुसरीपासून राम-कृष्ण एकाच वर्गात शिकत आले. राम खेळात, व्यायामात, विनोद सांगण्यात पटाईत होता. तर कृष्णाचं सामान्य ज्ञान खूप होतं. त्याला वाचनाची अत्यंत आवड. हातात पडलेली अक्षरे वाचल्याशिवाय तो टाकत नसे आणि त्यामुळे त्याची बोलण्याची शैली मंत्रमुग्ध करणारी होती.



अभ्यासावरून रामाला कोणी रागावलं, बोललं तर कृष्णाला आवडत नव्हतं तसंच कृष्णाला कोणी पुस्तकातला किडा म्हटलेलं रामला आवडतं नव्हतं. रामच्या घरातले त्याला सतत कृष्णाचं उदाहरण देऊन खिजवत तर कृष्णाला त्याच्या घराचे रामचं उदाहरण देत, पण त्यामुळे त्यांच्या मनात एकमेकांबद्दल असूया निर्माण न होता प्रेमचं वाढत जाई.

त्यावर्षी राम आणि कृष्णा आठवीत होते. राम परीक्षेत चांगला पास व्हावा म्हणून कृष्णा त्याच्याकडे अभ्यासाला जाई. कृष्णाच्या नादाने राम दोनदोन तास अभ्यास करी. अभ्यासात काही अडचण आली तर राम कृष्णाला विचारी आणि काय आश्चर्य कृष्णाने समजावून सांगितले की रामला ते चांगले कळत असे, लक्षात रहात असे. रामबरोबर केलेला अभ्यास कृष्णाला पुरेसा नसे कारण ते दोन तास त्याचे सगळे लक्ष रामच्या अभ्यासाकडे असे. कृष्णा घरी गेल्यावर जागून अभ्यास करी. रात्ररात्र जागून अभ्यासामुळे कृष्णाला काहीसे बरे वाटेनासे झाले तरी पण तो रामकडे जातच राहिला. रात्रीचे जागरण करीतच राहिला.






राम म्हणाला, कृष्णा तुझा चेहरा मलूल वाटतो, तू थकल्यासारखा वाटतोस. माझ्यासाठी तू केवढा वेळ देतोस. पण आता माझा अभ्यास मी करीन, तू तुझा अभ्यास कर, रात्रीचा जागू नकोस आजारी पडशील.

पण कृष्णाने त्याचं ऐकलं नाही तो दिवसा रामकडे जातच राहिला. रात्री जागरण करीतच राहिला आणि अखेर परीक्षेच्या पंधरा दिवस आधी तो आजारी पडला. कृष्णाला वाईट वाटलं. रामला रडू येऊ लागलं. एकेक दिवसांनी परीक्षा जवळ येत होती. कृष्णाचा



ई साहित्य प्रतिष्ठान

अशक्तपणा कमी होत नव्हता. कृष्णाला रामची काळजी वाटत होती आणि रामला कृष्णाची.



आता परीक्षेला फक्त आठ दिवस होते. त्या दिवशी सकाळी कृष्णा कसाबसा उठला. दूध नाश्तापाणी उरकून टेबलापाशी जाऊन बसला. इतिहासाचं पुस्तक उघडलं पण त्याच्याने ते हातात धरवेना कि वाचवेना. हे सर्व राम पहात होता. कृष्णासारखं आपणही हे परीक्षेचे आठ-पंधरा दिवस कृष्णाला अभ्यासात मदत करायची असं ठरवून तो कृष्णाकडे आला होता. कृष्णाच्या हातातून गळालेलं इतिहासाचं पुस्तक रामने हातात घेतलं आणि त्यातील प्रकरणे एकामागून एक आवेशपूर्ण वाचली. त्यांच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे दोन-दोनदा बोलून दाखवली.

कृष्णाने डोळे मिटून ती सर्व स्मरणात साठवली.

अशाच पध्दतीनी रामाने कृष्णाकडून अभ्यास करविला. नंतर परीक्षा झाल्या, दोघांनाही पेपर छान गेले. हातात रिझल्ट आले. रामाचा पहिला नंबर आलेला पाहून कृष्णाच्या डोळ्यात पाणी आले. कृष्णाचा दुसरा नंबर आला होता. रामाच्या यशात कृष्णाचा फार मोठा वाटा होता. आपला पहिला नंबर गेल्याचं त्याला मुळीसुध्दा दुःख झालं नाही. पण ओळींनी आलेले दोन नंबर नवव्या इयत्तेत जाताना तुकडी बदलून गेले. कृष्ण अभ्यासाच्या बाबतीत स्वावलंबी होताच. पण आता रामही तसाच स्वावलंबी बनला. दहावीसाठी त्यांनी एक प्लॅन केला. तो नववीच्या अगदी रिझल्टनंतर तो सर्वांना कळला.



काय होता तो प्लॅन ?

# गृहपाठातील आनंद



प्रज्ञाताईंची शाळा सुरू झाली. मे महिन्यांची सुट्टी कधी सुरू झाली आणि कधी संपली कळलंदेखील नाही आणि आता उद्या शाळेचा पहिला दिवस!

नाही म्हटलं तरी घरातील बरीचशी कामं उरकून शाळेला जायचं म्हणजे लवकरच उठायला हवं होतं आणि नेमका या गोष्टीचा प्रज्ञाताईंना कंटाळा!



उशिरा उठण्यापासूनच गोंधळाला सुरूवात होते. तरीपण शाळेत जाण्याची त्यांना विलक्षण ओढ!! मैत्रिणी बरेच दिवसांनी भेटणार, गप्पा टप्पा होणार!! वर्गात नवीन चेहरे कुतुहलाने

आपली वाट पहाणार आणि त्यांना शिकवता शिकवता आपणही रंगून जाणार! या विचारात त्यांचं काम आटोपणं चालू होत.

आपण करतो त्या कामाविषयी आपली जशी भावना असते तसा आनंद, दु:ख, कंटाळा याचा अनुभव आपल्याला येतो.




शाळा सुरू म्हणजे गृहपाठ सुरू झालाच. प्रज्ञाताईंना तीन मुले होती. सुट्टीत यायला न जमलेले प्रज्ञाताईंचे मोठे भाऊ आनंदमामा आज त्यांच्याकडे आले. रात्रीची जेवणंखावणं झाल्यावर सर्वजण झोपले. सकाळीच उठून आनंदमामा फिरायला गेले. परत आले तर सर्वजण गृहपाठाला बसलेले.

आनंदमामा म्हणाले, ‘अरे, व्वा, शहाणी मुलं अभ्यासाला बसलेली दिसतायत! छान! छान!! असं म्हणताना ते प्रज्ञाताईकडे-स्वयंपाकघरात गेले. चहापाणी करून बाहेर आल्यावर त्यांना न राहवून ते मुलांशी बोलायला लागले.’



‘काय रे पंडित, झाला की नाही तुझा अभ्यास?’

झा--लं! येवढंच विचारायचा अवकाश की पंडितनं हातातलं वहीपुस्तक आणि पेन धपकन खाली आपटलं आणि म्हणाला, ‘कसचा होतोय एवढ्यात अभ्यास! या वर्षीच्या आमच्या बाईंना काही कळतच नाही. केवढा अभ्यास दिलाय! अभ्यास करून करून अगदी वैताग आलाय.’



ई साहित्य प्रतिष्ठान

मामांनं प्रज्ञाकडे पाहून डोळे मिचकावले आणि कविताला म्हणाला, 'काय ग कविता, तुझ्या बाई नाहीत ना पंडितच्या बाईंसारख्या, खूप खूप अभ्यास-वैताग देणाऱ्या ?'




कवितानी आईकडे पाहिलं आणि म्हणाली,'नाही, एवढा अभ्यास नाही दिला वैतागण्याइतका, पण अभ्यासाची आता सवय गेलीय नं, म्हणून जरा त्रास वाटतो. अर्थात

तो अभ्यास आवश्यकच आहे, नाही का मामा?'

मामा हसत हसत म्हणाला, 'हो तर त्याशिवाय अभ्यासाचा गेलेला सराव आपल्याला परत कसा होणार!'





मग मामाची नजर गेली समाधानवर, 'काय रे समाधान, तुझं काय म्हणणं आहे गृहपाठाबद्दल?'

समाधान म्हणाला, 'मामा माझी तर काहीच तक्रार नाही गृहपाठाबद्दल. उलट मला आवडतो गृहपाठ करायला. बाईंनी शाळेत जे जे शिकवलं-ते शिकवताना जे जे सांगितलं त्यांची सगळ्याची उजळणी झाली गृहपाठ करताना. त्या अनुभव-उजळणीच्या आनंदात गृहपाठ केव्हा संपला ते कळलंसुध्दा नाही!'

‘मामा आज तू आमच्या शाळेत चल केवढी सुंदर इमारत झालीय आता! आणि आमचे शिक्षकही फार चांगले आहेत. तुझी ओळख करून देईन जमेल तेवढ्यांशी.’



त्या एवढा चांगला संस्कार तुझ्या मनावर केलायं, तर भेटलंच पाहिजे.

‘होय मामा, त्यांनापण तुला भेटल्याचा खूप आनंद होईल.’

‘पंडित आणि कविता, आपण एखादी गोष्ट करतो ना तेव्हा त्याच्याबद्दल आपल्या मनात प्रेम, आस्था, आदर या गोष्टी असल्या पाहिजेत. म्हणजे ती गोष्ट आपल्या अंगावर येत नाही. आपल्या हातून ती सहज होऊन जाते, एवढंच नाही तर त्यापासून

अतिशय आनंद आणि समाधान आपल्याला मिळतं!’

काय समाधान बरोबर आहे ना?

असं म्हणून मामांनी हसत हसत भाच्यांना जेवायला नेलं.



२००८ साली सुरू झालेल्या ,

**सव्वालाख** वाचकसंख्या असलेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना **पावणे दोनशेहून अधिक** दर्जेदार मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज असे एकाहून एक सरस विषय त्यांनी घेतले आहेत. ज्येष्ठ साहित्यिकांच्या साहित्यासोबतच सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले आहे. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकर्यांच्या आत्महत्या, प्रेमभंगातील निराशा , दहशतवाद अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं “ई श्टाप” देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी “संगीत कानसेन”चे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ “नेटाक्षरी” चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणार्या पुस्तिकांची मालिका “दुर्ग दुर्गट भारी” द्वारे जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली.

लवकरच आमचा ई-यत्ता हा ज्ञानवेध घेणारा उपक्रम सुरू होईल तर मराठीचं वैभव जे ज्ञानदेव तुकाराम अशा संतांच्या पुस्तिकांची एक मालिका आपल्या भेटीला येईल. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबर्याआ आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील. तर तरुणांमध्ये नव्या जगाला सामोरं जाण्याची हिंमत जागवणारं “उनाड” लवकरच आपल्या भेटीला येणार आहे.

esahity@gmail.com
www.esahity.com